# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली

**'विधी सेवा सदन' इमारत, जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली इमारतीचे मागे**

ई–मेल आयडी – gad-dlsa.mh@bhc.gov.in

भ्रमणध्वनी क्र. ८५९१९०३९३३

## शुद्धीपत्रक

*(Shuddhipatrak / Corrigendum Notice)*

**विषयः –** निविदा प्रक्रिया नव्याने राबविण्याबाबत शुद्धीपत्रक.

**संदर्भः –** ई–निविदा जाहीरात क्र. District Legal Services Authority, Gadchiroli, ........२०२५–२०२७/२, दिनांक ०४/०८/२०२५.

सदर शुद्धीपत्रकाद्वारे कळविण्यात येते की:

संदर्भामध्ये नमूद केलेली ई–निविदा दिनांक ०५/०८/२०२५ ते दिनांक १९.०८.२०२५ या कालावधीत प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतु, तिन पेक्षा कमी निविदा प्राप्त झाल्याने नियमाप्रमाणे निविदा प्रक्रिया नव्याने राबविणे आवश्यक आहे. करिता सदर नविदेमध्ये इसारा रक्कम, निविदा फि, सुट, अनामत रक्कम, तांत्रीक निविदा आणि सर्वसाधारण अटी व शर्ती मध्ये नमूद केलेले संकेतस्थळाचे अनुषंगाने आणि टंकलेखनातील काही दोषांचे अनुषंगाने सुधारणा करुन नियमाप्रमाणे निविदा प्रक्रिया नव्याने राबविण्यात येत आहे.

२. निविदा प्रक्रिया खालीलप्रमाणे राबविण्यात येणार आहे:

| | | |
|---|---|---|
| निविदा डाउनलोड करण्याचा कालावधी | : | दिनांक ०२/०९/२०२५ रोजीचे दुपारी ०२.०० वाजेपासून ते दिनांक ०९/०९/२०२५ रोजीचे दुपारी ०२.०० वाजेपर्यंत. |
| तांत्रीक निविदा उघडण्याचा दिनांक व मुळ दस्तऐवज सादर करण्याचा दिनांक | : | दिनांक १०/०९/२०२५ रोजी, दुपारी ०३.०० वाजता. |
| तांत्रीक निविदा उघडण्याचे ठिकाण | : | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली |
| आर्थिक निविदा उघडण्याचा दिनांक | : | तांत्रीक निविदेतील कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर आर्थिक निविदा उघडणेबाबत निविदाधारकांना कळविणेत येईल. |

**<u>महत्वाच्या सुचना:</u>**

०१. सर्व इच्छुक निविदाकारांनी सुधारित निविदा दस्ताऐवज काळजीपुर्वक वाचावे.

०२. पुर्वी सादर केलेल्या निविदा ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

०३. नविन निविदा फक्त सुधारित वेळापत्रकानुसारच सादर कराव्या.

**<u>अधिक माहितीसाठी संपर्क:</u>**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली
'विधी सेवा सदन' इमारत, जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली इमारतीचे मागे
ई–मेल आयडी – gad-dlsa.mh@bhc.gov.in
भ्रमणध्वनी क्र. ८५९१९०३९३३.

2/9/25
नोडल ऑफिसर

2/9/25
सचिव,
जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली

**'विधी सेवा सदन' इमारत, जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली इमारतीचे मागे**

ई—मेल आयडी — gad-dlsa.mh@bhc.gov.in

भ्रमणध्वनी क्र. ८५९१९०३९३३


## ई—निविदा सुचना

जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली यांचे कार्यालयीन कामकाजाकरीता लिपीक—टंकलेखक व शिपाई या पदांची सेवा बाह्य यंत्रणेद्वारे दोन वर्षांच्या करारासाठी नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ई—निविदा मागविण्यात येत आहेत.

विस्तृत निविदा सुचना व त्यासंबंधीच्या अटी व शर्तीसह दिनांक ०२/०९/२०२५ रोजीचे दुपारी ०२.०० वाजेपासून ते दिनांक ०९/०९/२०२५ रोजीचे दुपारी ०२.०० वाजेपर्यंत महाराष्ट्र शासनाचे http://www.mahatenders.gov.in तसेच जिल्हा न्यायालयाचे http://gadchiroli.dcourts.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

स्थळ :— गडचिरोली
दिनांक :— ०२/०९/२०२५

(विनायक रा. जोशी)
अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली
तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली.

(अं. पुं. खानोरकर)
सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली.

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली

## 'विधी सेवा सदन' इमारत, जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली इमारतीचे मागे

ई—निविदा कार्यप्रणाली निविदा सूचना क्र. District Legal Services Authority, Gadchiroli, ....... २०२५—२०२७/३ अंतर्गत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली (भ्रमणध्वनी क्र. ८५९१९०३९३३) येथे दोन वर्ष मुदतीच्या कालावधीकरीता लिपीक—टंकलेखक व शिपाई या पदांच्या कंत्राटी पध्दतीने सेवा उपलब्धतेसाठी ई—निविदा प्रणालीद्वारे पात्र निविदाकारांकडून ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे ठिकाण | कामाचे स्वरूप | शासन निर्णयाप्रमाणे पद संख्या | कामाची अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| १ | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली | जिल्हा विधी सेवा प्राधिकरणांतर्गत कामकाजामध्ये मदत करणे, या कामांकरीता लिपीक—टंकलेखक या पदाच्या सेवा बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करून देणे. | **पदसंख्या** लिपीक—टंकलेखक — ४ | **३३,८१,८८८/—** |
| २ | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली | कार्यालयातील दैनंदिन खटल्यांचा पुकारा करणे, कार्यालयीन कामकाजामध्ये मदत करणे, कार्यालयाअंतर्गत स्वच्छता करणे या कामांकरीता शिपाई या पदाच्या सेवा बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करून देणे. | **पदसंख्या —** शिपाई — १ | **६,१७,८६८/—** |
| | | | **एकूण ...** | **३९,९९,७५६/—** |

**<u>टिप :—</u>**

१. सदरची निविदा ही जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली येथील लिपीक—टंकलेखक व शिपाई या पदांकरीता एकत्रित समजण्यात यावी.

२. सदरची निविदा भरताना एकत्रित निविदा इसारा रक्कम रूपये ५०,०००/— नेट बॅंकिग प्रणालीने भरावयाची आहे.

३. निविदा फी रू. ३,०००/— नेट बॅंकिग प्रणालीने भरावयाची आहे.

३अ ज्या निविदाकारांना शासकीय निर्णयातील / नियमातील तरतुदींप्रमाणे इसारा रक्कमेत / निविदा फि मध्ये सुट मागावयाची आहे अशा निविदाकारांनी नियमानुसार आवश्यक असलेले सर्व कागदपत्र तांत्रीक निविदेमध्ये सादर करावे आणि निविदा भरतांना त्याचा तपशील नियमानुसार योग्य त्या ठिकाणी नमूद करावा.

५. ई निविदा पोर्टलवर 'बीड लॉक' झाल्यानंतर निविदांबाबत 'हार्ड कॉपी' सत्यप्रतीसह एका प्रतीत कंत्राटदारांनी निविदा सादर करावयाच्या वेळेपासून ७२ तासात सादर करणे अनिवार्य आहे.

## : निविदेचे वेळापत्रक :

| | | |
|---|---|---|
| निविदा डाउनलोड करण्याचा कालावधी | : | दिनांक ०२/०९/२०२५ रोजीचे दुपारी ०२.०० वाजेपासून ते दिनांक ०९/०९/२०२५ रोजीचे दुपारी ०२.०० वाजेपर्यंत. |
| तांत्रीक निविदा उघडण्याचा दिनांक व मुळ दस्तऐवज सादर करण्याचा दिनांक | : | दिनांक १०/०९/२०२५ रोजी, दुपारी ०३.०० वाजता. |
| तांत्रीक निविदा उघडण्याचे ठिकाण | : | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा व सत्र न्यायालय, गडचिरोली |
| आर्थिक निविदा उघडण्याचा दिनांक | : | तांत्रीक निविदेतील कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर आर्थिक निविदा उघडणेबाबत निविदाधारकांना कळविणेत येईल. |

**टिप :—**

१. सर्व पात्र /इच्छुक निविदाकरांनी निविदापत्रक डाउनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेणेसाठी ई निविदा प्रणालीच्या mahatenders.gov.in वर enrolled करणे आवश्यक आहे.

२. निविदाकारांना वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी खालील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा:

.....१८०० ३०७० २२३२

३. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा रक्कम अथवा निविदा बयाना रक्कम online पध्दतीने भरणेची आहे.

४. सदर बयाणा रक्कम http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरही भरता येईल. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

५. संस्था नोंदणीकृत असावी आणि वस्तु व सेवा कर भरणारी असावी.

६. इतर अटी व शर्ती ई–निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील, सदर कामांची एक अथवा सर्व ई–निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

७. निविदा जारी केल्यानंतर, निविदांची मागणी केलेल्या अधिकारी यांनी निविदा कागदपत्रांमध्ये काही बदल केल्यास ते शुद्धीपत्रक/परिशिष्टाच्या स्वरुपात कळवले जाईल आणि ते निविदा कागदपत्रे आणि कराराचा भाग असेल.

८. वरील निविदा http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर पहायला मिळेल.

९. शासन निर्णय विधि व न्याय विभाग, ३ सप्टेंबर, २०१४, विधि व न्याय विभाग दि. २७ जानेवारी, २०१५, विधि व न्याय विभाग दि. २३ फेब्रुवारी २०१७, विधि व न्याय विभाग दि. ९ ऑगस्ट, २०१७, शासन निर्णय वित्त २ ऑगस्ट, २०१६ व शासन निर्णय क्रमांक–पदनि–२०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क दि. २७ एप्रिल,२०२२ या शासन निर्णयांच्या अधिन राहुन निविदा भरणेची आहे.

१०. तसेच इतर विद्यमान आणि भविष्यातील शासकिय निर्णय हे या निविदेचा भाग असतील.

(विनायक रा. जोशी)
अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली
तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली.

(अं. पुं. खानोरकर)
सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली.

# अटी व शर्ती

## बयाना रक्कम (Earnest Money Deposit)- (Technical Bid envelop)

१. खालील नमुद केलेल्या बाबींची पुर्तता निविदाकाराकडुन न झाल्यास सदर निविदाकाराची बयाणा रक्कम जप्त करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

**अ.** निविदा स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर निविदा किंवा प्रस्ताव मागे घेणे किंवा त्यात फेरफार करणे.

**ब.** करारावर सही न करणे.

**क.** निविदा किंवा प्रस्ताव स्विकारण्यात आल्यानंतर करारानुसार कामगिरीसाठी आवश्यक सुरक्षा अनामत न भरणे.

**ड.** निविदा दस्तावेजामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे करारावर सही करण्यापुर्वी कोणत्याही अन्य अटींची पुर्तता न करणे.

**इ.** निविदा स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर निविदा किंवा प्रस्ताव मागे घेणे किंवा त्यात फेरफार करणे.

**ई.** करारावर सही न करणे.

**२.** अयशस्वी निविदाधारकाला बयाणाची रक्कम (कोणत्याही व्याजाशिवाय) परत केली जाईल.

**३.** यशस्वी निविदाधारकाच्या बाबतीत, काम दिल्यानंतर सुरक्षा ठेव भरल्यानंतर किंवा बॅंक हमी सादर केल्यानंतर बयाणा रक्कम (कोणत्याही व्याजाशिवाय) परत केल्या जाईल आणि जर यशस्वी निविदाधारकाने विहित वेळेत अनामत रक्कम भरली नाही आणि करारपत्र तयार केले नाही, तर त्याची बयाणा रक्कम सरकारकडे जप्त केली जाईल.

**अनामत रक्कम :—**

अ. यशस्वी निविदाकाराला सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोलीकडे आदेश मुल्याच्या कमीत कमी ३ (तीन) टक्के इतकी अनामत रक्कम सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली यांचे नावे कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेतून काढलेल्या मुदत ठेव पावतीच्याद्वारे किंवा कोणत्याही राष्ट्रीयकृत बॅकेतील कराराच्या कालावधीत वैध राहणाऱ्या बॅकेच्या हमीद्वारे निविदेचा निकाल अधिसुचित करण्यात आल्यानंतर १५ दिवसांचे आंत सादर करावी लागेल, आणि त्याला/तिला त्याबाबत शासकीय निर्णयातील / नियमातील तरतुदींप्रमाणे कोणतीही सुट मागावयाची असल्यास नियमानुसार आवश्यक ते सर्व कागदपत्रे विहित वेळेत सादर करणे बंधनकारक राहिल, आणि त्याने / तिने असे न केल्यास जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली निकालाची अधिसुचना रद्द करु शकेल.

ब. कंत्राटदाराकडून जमा केलेल्या किंवा वसूल केलेल्या अनामत रकमेवर कोणतेही व्याज देण्याची जबाबदारी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोलीवर राहणार नाही.

क. कराराचा कालावधी पुर्ण झाल्यानंतरच अनामत रक्कम परत केली जाईल.

**निविदा प्रक्रिया—**

संपुर्ण निविदा प्रक्रिया ऑनलाईन ई—निविदा असुन ती, तांत्रिक निविदा लखोटा **(Technical Bid Envelop)** व आर्थिक निविदा लखोटा **(Financial Bid Envelop)** अशा दोन लखोटा पध्दतीत राहील.

**अ) तांत्रिक निविदा—**

१. निविदा अर्जाचे शुल्क व बयाणा रक्कमेचा भरणा शासकीय नियमाप्रमाणे केला असणे आवश्यक. **(Tender Form Fee & E.M.D.)**

२. कंपनीचे/ संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र. **(Registration Certificate)**

३. पॅन कार्ड **(Pan Card)**

४ मागील तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र व ताळेबंद उदा. २०२१—२०२२, २०२२—२०२३ ते २०२३—२०२४.

५. प्रोफेशनल टॅक्स **(Professional Tax)** प्रमाणपत्र.

६. वस्तू व सेवा कर **(GST Registration)** प्रमाणपत्र.

७. निविदाकाराने लिपीक टंकलेखक व शिपाई यांची सेवा केंद्र शासन/ महाराष्ट्र शासन वा इतर अन्य आस्थापनांमध्ये पुरविली असल्यास याबाबतचे संबंधित कार्यालयाचे जारी केलेले कार्यादेश आणि कामाच्या अनुभवाचे प्रमाणपत्र सादर करावे. **(Experience Certificate)**

८. ई.पी.एफ. **(Employees Provident Fund)** नोंदणी प्रमाणपत्र.

९. ई.एस.आय.एस **(Employees State Insurance Scheme)** नोंदणी प्रमाणपत्र.

१०. कामगार परवाना **(Labour License)** नोंदणी प्रमाणपत्र.

१०अ. निविदाकार इसारा रक्कमेत / निविदा फि मध्ये सुट मागत असल्यास, त्यांना त्याबाबत सुट आहे हे दर्शविणरे नियमानुसार आवश्यक असलेले सर्व कागदपत्र.

११. निविदा अटी व शर्तीची निविदाकराची सही व शिक्का.

**तांत्रीक निविदेमध्ये नमुद केलेली सर्व कागदपत्रे वर दिलेल्या क्रमानेच सादर करण्यात यावी. तसेच अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती तांत्रीक पडताळणीकरीता सादर करण्यात याव्यात. कंत्राटदाराने निविदा अर्जासोबत सदर प्रमाणपत्रे सादर न केल्यास, निविदा अर्ज निविदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.**

सर्वप्रथम तांत्रीक निविदा उघडण्यात येईल. तांत्रीक निविदा उघडताना निविदाकार अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी हजर राहणे आवश्यक आहे व त्यावेळेस त्यांनी प्रमाणपत्राच्या मुळ प्रती पडताळणीसाठी हजर ठेवणे आवश्यक आहे. जर निविदाकार तांत्रीक निविदेमध्ये नमुद केलेल्या बाबींची पुर्तता करीत नसेल तर त्याची निविदा अपात्र ठरविण्यात येईल व सदर निविदाकाराची आर्थिक निविदा पुढील कार्यवाहीसाठी ग्राहय धरण्यात येणार नाही. पात्र ठरणाऱ्या निविदाकारांचीच आर्थिक निविदा उघडण्यात

येईल. निविदेमध्ये नमुद केलेली निविदा स्विकारण्याची व उघडण्याची तारीख पुढील कार्यालयीन दिवस व नियोजित वेळेस राहील. आर्थिक निविदेमधील रक्कम तांत्रीक निविदेमध्ये नमुद करण्यात येऊ नये, जर तसे आढळल्यास संबंधीत निविदाकाराची निविदा बाद ठरविण्यात येईल.

**ब) आर्थिक निविदा—**

१. निविदेचे दर हे दरपत्रक **(BOQ)** यामध्ये सर्व करासहीत नमुद करावेत.

२. आर्थिक निविदेमध्ये निविदाकराने नमुद केलेले दर निविदेमधील सर्व अटी व शर्तीची पुर्तता करीत असेल, तर पुढील कार्यवाहीसाठी निविदा ग्राहय धरण्यात येईल.

३. **महत्वाचेः—** ज्या निविदेमध्ये कंत्राटदाराने त्याच्या कामगारांना अदा करावयाची वेतनाची रक्कम, ही किमान वेतन कायदयातील तरतुदीनुसार कंत्राटदाराकडून कंत्राटी कामगाराला देय असलेले किमान वेतन + विशेष भत्ता + बोनस + भविष्य निर्वाह निधी + राज्य कामगार विमा योजनेस जमा करावयाची रक्कम + उपदान इत्यादी मिळून होणारी रक्कम व कामगार कायदयातील इतर तरतुदीनुसार देय रक्कमा यापेक्षा कमी नमूद केली असल्यास, अशा कंत्राटदाराची निविदा स्विकृत करण्यात येणार नाही.

४. निविदा स्विकारण्याचा अधिकार या कामासाठी नियुक्त केलेल्या निवड समितीला असतील व कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार सदर समितीला असेल.

## क) कंत्राटदारातर्फे पुरवण्यात येणारे कर्मचाऱ्यांच्या बाबत अटी व शर्ती —

१. कंत्राटदाराने पुरवलेले कंत्राटी कामगारांचे वय १८ वर्षांपेक्षा कमी नसावे आणि त्यांनी खाली नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक पात्रता धारण केली असणे अनिवार्य असेल:

**लिपीक—टंकलेखक पदासाठी :—**

(अ) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवी घेतलेली असणे आवश्यक आहे.

(आ) त्यास जिल्ह्यातील न्यायालयाच्या प्रादेशिक भाषेचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

(इ) सरकारी व्यावसायिक प्रमाणपत्र परिक्षा किंवा सरकारी मंडळाद्वारे घेतलेली परीक्षा किंवा संगणक टंकलेखन बेसिक कोर्स यामध्ये सरकारी प्रमाणपत्र (GCC-TBC किंवा I.T.I.) — यामध्ये इंग्रजी टंकलेखन ४० श. प्र. मी. किंवा त्याहून अधिक गती आणि मराठी टंकलेखन ३० श. प्र. मी. किंवा त्याहून अधिक गती.

(ई) खालीलपैकी कोणत्याही संस्थेतून प्राप्त M. S. Office, M. S. World, Wordstar-7 आणि Open Office Org. या व्यतिरिक्त Window आणि Linux मध्ये Word Processor चालवण्यामध्ये प्राविण्याबद्दल संगणक प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

i) महाराष्ट्र किंवा गोवा राज्यातील वैधानिक विद्यापीठे, यथास्थिती.

ii) महाराष्ट्र किंवा गोवा राज्य तंत्र शिक्षण मंडळ, यथास्थिती.

ii) NIC, DOEACC, APTECH, NIIT, C-DAC, DATAPRO, SSI, BOSTON, CEDIT, M.S. CIT.

iv) महाराष्ट्र किंवा गोवा सरकारने जारी केलेले संगणक ज्ञानाच्या

पात्रतेबाबतचे प्रमाणपत्र, यथास्थिती.

**<u>शिपाई पदासाठी :—</u>**

किमान १० वी परीक्षा उर्तीण केलेली असावी आणि त्याची शरीरयष्टी चांगली असावी.

२. कंत्राटी कर्मचरी यांना कोणत्याही अपघातामुळे शारीरिक/जिवत हानी झाल्यास सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील. अध्यक्ष, विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली यांचे कडून कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई किंवा मदत दिली जाणार नाही.

३. कंत्राटदार/निविदाधारकाच्या लिपीक/शिपाई यांचे अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांचे सोबत संबंध केवळ बाह्य यंत्रणेमार्फत भरती केलेले कंत्राटी कर्मचारी म्हणून असतील आणि ''मालक'' आणि ''कामगार'' किंवा ''नियोक्ता'' आणि ''कर्मचारी'' किंवा ''प्रकर्ता (Principal)'' आणि ''एजंट'' असे नसतील.

४. चरित्र पडताळणी झाल्यानंतर, बाह्य यंत्रणेमार्फत भरती केलेल्या लिपीक—टंकलेखक /शिपाई यांना जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली कडून कंत्राटदाराचे खर्चाने ओळखपत्र प्रदान केल्या जातील. परंतु, सदर कर्मचारी हे करार संपल्यानंतर किंवा कराराचा कालावधी संपल्यानंतर, किंवा त्यांना कामावरुन काढून टाकले असेल तेव्हा किंवा त्यांनी राजिनामा दिला असेल तेव्हा किंवा त्यांनी इतर कोणत्याही कारणास्तव कार्यालयात काम करणे थांबवले असेल तेव्हा सदरचे ओळखपत्र जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली चे कार्यालयात परत करतील.

५. कंत्राटदार त्याच्या मनुष्यबळाच्या वर्तनाची जबाबदारी घेईल. संशयास्पद, प्रामाणिकपणा किंवा वाईट चरित्र असलेल्या कोणत्याही लिपीक / शिपाईला कंत्राटदाराकडून कामावर ठेवता येणार नाही.

६. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोलीचे कार्यालयात काम करणाऱ्या लिपीक/शिपाई यांचे नावे, पत्ते, ई–मेल, भ्रमणध्वनी संपर्क क्रमांक आणि आधार कार्ड हे कार्यालयात रुजू झाल्यापासून ७ दिवसांचे आत सुरक्षा पडताळणीसाठी सादर करावे लागतील.

**ड) <u>सर्वसाधारण अटी व शर्ती –</u>**

१. निविदाकाराने कामाच्या ठिकाणी स्वत: भेट द्यावी आणि त्याचे दर देण्यापूर्वी प्रस्तावित कामाची स्वत:ला ओळख करुन घ्यावी आणि स्थानिक कार्यालयाची स्थिती, कामाचे निर्बंध, अडथळे, आवश्यक मंजुरीबाब निविदा कागदपत्रांमधील अटी, स्थानिक अधिकाऱ्यांकडून कामासाठी आवश्यक असलेले एन.ओ.सी. तपासावे आणि कामाच्या अंमलबजावणीदरम्यान होणाऱ्या सर्व खर्चासह प्रस्तावाचे कोटेशन द्यावे.

२. निविदाकाराची केलेली अतिरिक्त देयकांसाठीची कोणतीही मागणी किंवा दावा किंवा भरपाई जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली कडून स्विकारली जाणार नाही.

३. वर आर्थीक निविदेच्या बाबत नमूद केलेल्या अट क्र. **ब (३) ला** अधिन राहून पात्र झालेल्या निविदांमधून सर्व अटी व शर्तीचे/शासनाने वेळोवेळी प्रस्तुत केलेले शासन निर्णय/ज्ञापन/ परिपत्रके यांचे पालन करुन पात्र ठरलेल्या निविदांमधील न्युनतम किंमतीची निविदा स्विकृत करण्यात येईल व प्राप्त झालेल्या सर्व निविदांच्या छायांकित प्रतिसह पात्र ठरलेल्या निविदेचा मंजूरी प्रस्ताव माननीय महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायालय, मुंबई यांची मान्यता घेऊन त्यांचे मार्फत प्रशासकीय मान्यते करीता शासनाकडे पाठवला जाईल आणि शासनाची आवश्यक मान्यता, स्विकृती आणि मंजूरी मिळाल्यानंतरच, निविदा काम यशस्वी कंत्राटदाराला दोन वर्षांच्या कालावधीसाठी दिले जाईल.

४. निविदा प्रक्रियेदरम्याण आणि कराराच्या कालावधीत जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली यांनी मागितलेले कोणत्याही प्रकारचे स्पष्टीकरण निविदाधारक सादर करतील.

५. यशस्वी निविदाधारकाला, महाराष्ट्र शासनाचे मंजुरीनंतर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली कडून पत्राद्वारे कळविल्या जाईल आणि त्यांना असे कळविल्यापासून ७ दिवसांचे आत कराराची संपुर्ण औपचारिकता पुर्ण करण्याचे निर्देश दिले जातील.

६. कार्यदेश अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली यांचे कडून दिला जाईल.

७. निविदाकृत काम दिल्यानंतर, यशस्वी कंत्राटदार हा जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली सोबत करार करेल आणि शासकिय नियमांनुसार नोंदणी आणि मुद्रांक शुल्काचा खर्च उचलेल.

८. यशस्वी निविदाकाराला कोणत्याही परिस्थितीमध्ये हा करार इतर कोणत्याही व्यक्ती/कंपनीला हस्तांतरीत, अभिहस्तांकित (Assigned) करता येणार नाही किंवा अन्य कोणत्याही प्रकारे सोपवता येणार नाही.

९. कंत्राटदाराने न्यायालयाचे कामकाजासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायदयातील तरतुदींपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले, तर संबंधीत कंत्राटदारावर किमान वेतन कायदयातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्यांचे कंत्राट तात्काळ रद्द करून त्यांचे नाव काळया यादीत टाकण्याची कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१०. कराराचे कालावधीत कोणत्याही महत्वाच्या दायित्वाचे उल्लंघन झाल्यास आणि/किंवा कराराच्या कालावधीत असमाधानकारक कामगिरी झाल्यास १५ दिवसांचे पुर्वसूचनेद्वारे करार रद्द करण्याचे सर्व अधिकार अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली राखून ठेवत आहेत.

११. कराराचे कालावधीत आणि/किंवा कराराची मुदतपूर्व समाप्ती झाल्यास, कंत्राटदार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली ला नुकसान भरपाई देईल.

१२. कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना कामाचे वेतन व त्या अनुषंगीक इतर सर्व भत्ते रोख स्वरूपात अदा न करता संबंधीत कंत्राटी कामगाराच्या नावाने रेखांकित धनादेशाद्वारे अदा करावेत.

१३. कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराला दिलेल्या धनादेशाची, छायांकित प्रत, सदर धनादेश स्विकारल्याची कंत्राटी कामगाराची स्वाक्षरी असलेले वेतन देयक (ज्यावर सदर धनादेश क्रमांक लिहीलेला असेल), कंत्राटदाराने दरमहा संबंधीत कार्यालयात सादर करावे लागतील. जोपर्यंत कंत्राटदार वरील कागदपत्रे सादर करणार नाहीत, तोपर्यंत त्या महिन्याचे कंत्राटदाराचे देयक अदा करण्यात येणार नाही.

१४. किमान वेतन कायदयातील तरतुदीनुसार कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना भरपगारी साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक असेल व अशा सुट्टीचे दिवशी कार्यालयास कंत्राटी कामगारांच्या सेवेची आवश्यकता भासल्यास त्याचे ऐवजी दुसरा कामगार उपलब्ध करून देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

१५. सुट्टीच्या दिवशी कंत्राटी कामगाराकडुन काम करून घेतल्यास त्या दिवसाची बदली रजा देण्यात यावी. मात्र अशी बदली रजा देताना त्यादिवशी कार्यालयातील कामकाजाचा खोळंबा होवू नये म्हणून दुसऱ्या कामगाराची सोय करण्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

१६. शासकीय कामाचे वेळेनंतर कंत्राटी कामगारांना जास्तीचे शासकीय काम करावे लागल्यास त्यांना अतिकालीन भत्ता देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालीन भत्ता देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

१७. कंत्राटदारास त्यांनी नेमलेल्या कंत्राटी लिपीक—टंकलेखक व शिपाई यांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार वेतन, इतर सवलती व सेवा शर्ती लागु करणे बंधनकारक असेल.

१८. ज्या कंपनीस/ संस्थेस काम सोपविण्यात येईल त्यांनी त्या बाबतच्या अटी व शर्ती नुसार करार करणे आवश्यक राहील.

१९. कंपनी/ संस्थेतर्फे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे सेवेचे कोणतेही उत्तरदायीत्व शासनावर किंवा कार्यालयावर राहणार नाही.

२०. कंत्राटदारामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा / सुविधा इत्यादीबाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल व वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

२१. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली ला कंत्राटी पध्दतीवर पुरविण्यात येणाऱ्या सोई—सुविधा/काम यांचेसाठी जी कंत्राटी सेवा कंत्राटदारामार्फत उपलब्ध करून देण्यात येणार आहे, त्याअनुषंगाने लागु असणारे सर्व कर कंत्राटदाराने अदा करावेत.

२२. कंत्राटदार संस्था/कंपनी यांनी कंत्राटी सेवा उपलब्ध करून देताना, शासन निर्णय विधि व न्याय विभाग, ३ सप्टेंबर, २०१४, विधि व न्याय विभाग दि. २७ जानेवारी, २०१५, विधि व न्याय विभाग दि. २३ फेब्रुवारी २०१७, विधि व न्याय विभाग दि. ९ ऑगस्ट, २०१७, शासन निर्णय वित्त २ ऑगस्ट, २०१६ व शासन निर्णय क्रमांक—पदनि—२०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क दि. २७ एप्रिल, २०२२ मधील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

२३. उपरोक्त कामासाठी कंत्राटदारामार्फत ज्यांना काम देण्यात येणार आहे, त्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे नियम व अटी व शर्ती लागू राहणार नाहीत. तसेच त्यांना नियमित कर्मचााऱ्यांप्रमाणे कोणतेही वेतन व भत्ते तथा अनुषंगिक लाभ

अनुज्ञेय/लागु राहणार नाहीत. त्यांच्या सेवा कालावधी किंवा कर्तव्य कालावधी व मानधनाबाबत हे कार्यालय कसल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

२४. नियुक्ती प्रधिकाऱ्याने सुचविलेली सर्व कामे तसेच आयत्यावेळी कामाचे स्वरूप बदलल्यास त्याप्रमाणे, कंत्राटदार संस्था/कंपनी यांनी कामे करून देणेचे त्यांचेवर बंधनकारक राहिल.

२५. कंत्राटदाराने अर्जासोबत वर नमूद केलेली बयाणा रक्कम शासकीय नियमाप्रमाणे जमा करावी लागेल.

२६. कंत्राटदाराने/संस्थेने /कंपनीने त्यांचे तांत्रीक निविदेतील सर्व कागदपत्रांची सांक्षांकित प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकार आहे. सदर कागदपत्रे न जोडल्यास त्यांचा निविदा अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

२७. कंत्राटदारास कंत्राटी कामाचा मोबदला अदा करताना त्यातुन नियमाप्रमाणे आयकर कापून घेणेत येईल.

२८. कंत्राटी कामगारांनी कार्यालयात काम करताना त्यांच्या नजरेस ज्या काही बाबी येईल, त्या कार्यालयीन बाबी आहेत याची जाणीव ठेवून त्यासंबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवणे, तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही याची दक्षता घेणे, याबाबी कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

२९. कंत्राटदारामार्फत नेमलेल्या कंत्राटी कामगारांकडून सरकारी मालमत्तेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास, नुकसान भरपाईची रक्कम कंत्राटदार यांना देय असलेल्या रकमेतुन वसुल करणेत येईल.

३०. केवळ ई—निविदा भरली म्हणून कंत्राटावर हक्क सांगता येणार नाही.

३१. ई–निविदा पोर्टलवर **'बीड लॉक'** झाल्यानंतर निविदांबाबत **'हार्ड कॉपी'** एका प्रतीत कंत्राटदारांनी निविदा सादर करावयाच्या वेळेपासून ७२ तासात सादर करणे अनिर्वाय आहे.

३२. निविदा आमंत्रीत करणारे अधिकारी यांना कोणत्याही विलंब / अडचणी / असुविधा / इंटरनेट / वेबसाईटशी संबंधीत समस्यांसाठी किंवा इतर कोणत्याही कारणासाठी जबाबदार धरले जाणार नाही. या संदर्भात कोणताही दावा विचारात घेतला जाणार नाही.

(विनायक रा. जोशी)
अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली
तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, गडचिरोली.

(अं. पुं. खानोरकर)
सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली.

## निविदा नमुना

| | | |
|---|---|---|
| निविदा मागविणा—या कार्यालयाचे नाव | : — | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, गडचिरोली. |
| **कामाचे स्वरूप** | : — | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, गडचिरोली येथे दोन वर्ष मुदतीच्या कालावधीकरीता लिपीक टंकलेखक व शिपाई यांची सेवा बाह्य यंत्रनेद्वारे कंत्राटी पद्धतीने उपलब्ध करून घेणेबाबत. (सदर कामाची सविस्तर माहिंती/अटी, शर्ती तसेच कामाचे स्वरूप दर्शविणारे विवरणपत्र सोबत जोडले आहे.) |
| **ई—निविदा क्रमांक** | : — | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, गडचिरोली .....२०२५—२०२७/३. |
| कंत्राटदार संस्थेचे/ कंपनीचे नाव | : — | |
| कंत्राटदार संस्थेचे/ कंपनीचा संपुर्ण पत्ता | : — | |
| कंत्राटदार संस्थेचे/ कंपनीचा संपर्क दूरध्वनी | : — | |
| कंत्राटदार संस्थेचे/ कंपनीचा नोंदणी क्रमांक | : — | |
| कंत्राटदार संस्थेचे/ कंपनीचा सेवा कर क्रमांक | : — | |

कंत्राटदार / संस्थेने पुढील तक्त्याप्रमाणे माहिती भरून द्यावी...

| अ. क्र. | न्यायालयाचे नांव | पदसंख्या | कंत्राटी सेवा पुरविणेसाठी कंत्राटदाराने मागणी केलेली एकूण रक्कम (१ वर्षाकरीता खर्च रूपये) | जी. एस. टी (१ वर्षाकरीता खर्च रूपये) | एकुण रक्कम रूपये (स्तंभ ४ + ५) | एकुण रक्कम (रूपये) अक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, गडचिरोली | लिपीक—टंकलेखक पदसंख्या ४ | | | | |
| | जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय, गडचिरोली | शिपाई पदसंख्या १ | | | | |
| | एकुण | | | | | |

निविदेची दोन वर्षासाठी होणारी रक्कम : रूपये. ........................................../—

(अक्षरी एकूण रूपये ....................................................../—)

(कंत्राटदाराचे नाव, सही, व शिक्का दिनांक)

(अ.क्र.४ ते ७ हया स्तंभातील माहिती कंत्राटदाराने भरावयाची आहे.)